**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत प्रशासकीय खर्च करण्याबाबतच्या आराखडयास ग्रामीण रोजगार हमी आयुक्त (विभागीय आयुक्त) यांची मान्यता घेण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १० मार्च, २०११
शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक : मग्रारोहयो २०१०/प्रक्र १२/रोहयो-१४

**पहा :-** १) शासन निर्णय नियोजन विभाग क्र. मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०४/रोहयो१० दिनांक १९.१०.२००६
२)शासन नियोजन विभाग परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१०/प्र.क्र.१२/रोहयो१४, दिनांक ११.११.२०१०

**प्रस्तावना :-**

शासनाच्या उपरोर्लिखित दिनांक ११.११.२०१० च्या परिपत्रकानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या प्रशासकीय खर्च करणेबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या असून त्यानुसारच काटेकोरपणे कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

शासनाच्या उपरोर्लिखित दिनांक १९.१०.२००६ च्या शासन निर्णयानुसार योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या असून सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद १४.१ तसेच १५ अन्वये प्रशासकीय खर्चाबाबत आराखडा तयार करुन अशा आराखडयाला ग्रामीण रोजगार हमी आयुक्तांची मान्यता घ्यावी असे नमूद करण्यात आलेले आहे.

२००६ मध्ये सदर योजना प्राथमिक स्वरुपात असताना प्रशासकीय खर्च करण्याबाबत ग्रामीण रोजगार हमी आयुक्तांची मान्यता घेण्याबाबत तरतूद करण्यात आली होती तथापि जिल्हयांना थेट केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होत असतो, प्रशासकीय खर्चाबाबत केंद्र शासनाने वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. राज्य शासनानेही दिनांक ११.११.२०१० च्या

परिपत्रकान्वये सविस्तर सूचना प्रसृत केलेल्या आहेत, योजनेचे सनदी लेखापालामार्फत (C.A) ऑडीट होत असते याबाबींचा विचार करता प्रशासकीय खर्चासाठी रोजगार हमी आयुक्तांची मान्यता घेण्याचे प्रयोजन आढळून येत नाही. याबाबींचा विचार करुन शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

शासन निर्णय नियोजन विभाग क्र.मग्रारोहयो २००६/ प्र.क्र.१०४/ रोहयो १० दिनांक १९.१०.२००६ मधील परिच्छेद १४.१ व परिच्छेद १५ मध्ये जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांनी प्रशासकीय खर्चाच्या आराखडयास ग्रामीण रोजगार हमी आयुक्तांची (विभागीय आयुक्त) मान्यता घेण्याची बाब निष्काषित करण्यात येत असून यापुढे जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांचे स्तरावर करावयाच्या प्रशासकीय खर्चाला ग्रामीण रोजगार हमी आयुक्तांच्य मान्यतेची आवश्यकता असणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( व्हि. गिरीराज )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

विभागीय आयुक्त, सर्व
जिल्हाअधिकारी ( मुंबई व मुंबई उपनगर वगळून ) सर्व
उपजिल्हाअधिकारी (रोहयो) मुंबई व मुंबई उपनगर वगळून) सर्व,
सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग,
रोहयो - १ (सारसंग्रहाकरिता),
निवडनस्ती - रोहयो १४